# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
# Maharashtra Public Service Commission


मुख्य कार्यालय : ५½ ७ व ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई ४०००२१ दूरध्वनी-२२७९५९०० फॅक्सः२२८८०५२४
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा माळा, फोर्ट, मुंबई ४००००१ दूरध्वनी :२२६७०२१०/१४८/२४८,२२१०२२२२. फॅक्स : २२६७३९१५

ई-मेल – sec.mpsc@maharashtra.gov.in वेबसाईट - www.mpsc.gov.in, https://mahampsc.mahaonline.gov.in


क्रमांक:सीटीटी-०९२०/सीआर-४६/२०१९/तीन दिनांक:-१७ मार्च,२०२०

## -: प्रसिध्दीपत्रक :-

**विषय:-राज्यसेवा पूर्व परीक्षा २०२० च्या आयोजनाबाबत**

महाराष्ट्र शासनाने करोना विषाणूचा वाढता प्रादुर्भाव रोखण्याकरीता प्रतिबंधात्मक उपाययोजनेचा भाग म्हणून महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत आयोजित केल्या जाणा-या परीक्षा दिनांक ३१ मार्च, २०२० पर्यंत पुढे ढकलण्याची सूचना दिनांक १५ मार्च, २०२० रोजीच्या शासन पत्राद्वारे आयोगास केली आहे. तथापि, आयोगाच्या पूर्व नियोजित वेळापत्रकानुसार दिनांक १६ मार्च, २०२० ते दिनांक ३१ मार्च, २०२० या कालावधीमध्ये आयोगामार्फत कोणतीही परीक्षा घेण्याचे प्रस्तावित नाही.

**२.** पूर्व नियोजित वेळापत्रकानुसार रविवार, दिनांक ५ एप्रिल, २०२० रोजी राज्यसेवा पूर्व परीक्षा २०२० घेण्याचे नियोजित आहे. प्रस्तुत परीक्षेच्या आयोजनासंदर्भातील पूर्व तयारी झालेली असल्याने योग्य ती दक्षता घेऊन पूर्वनियोजित वेळापत्रकानुसार राज्यसेवा पूर्व परीक्षा २०२० घेण्यात येईल.

**३.** दिनांक ३१ मार्च, २०२० पर्यंत राज्यातील करोना विषाणूच्या प्रादुर्भावाची स्थिती व त्या वेळी राज्य शासनाकडून राबविण्यात येणा-या उपाययोजना विचारात घेऊन दिनांक ५ एप्रिल, २०२० रोजी होणा-या राज्यसेवा पूर्व परीक्षा २०२० च्या आयोजनाच्या अनुषंगाने फेरआढावा घेण्यात येईल.

उपसचिव, परीक्षा पूर्व
महाराष्ट्र लोकसेवा आयोग.